गेवराईचे डी.वाय.एस.पी.नीरज राजगुरुच्या राज्यात माफिया बोकाळला वाचा उद्याच्या अंकात...

MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

संपादक - दिपक थोरात

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ



बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२४२ | शनिवार दि.२५ मे २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -242 | SATURDAY DT. 25 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# ज्ञानराधा, साईराम, जिजाऊ, राजस्थानी, या बँकवाल्यांनी ठेवीदारांच्या पैशावर अमाप संपत्ती उभा केली?







गोरगरिबांच्या रुपया रुपया जमा करून हजारो कोटी रुपये जमा केले खरे पण ते हजारो कोटी रुपये गायब कसे काय होतात स्वत:ची व स्वत:च्या परिवाराची अय्याशी याच पैशावर?




# ठेवीदारांनो पोलिसात गुन्हा दाखल केल्याशिवाय तुमचे पैसे मिळणार नाहीत?

- राजकीय नेते ठेवीदारांच्या संपर्कात लोकसभेत निवडणुकीत सुद्धा नेत्यांकडून ठेवीदारांची दिशाभूल?
- ठेवीदारांनो तुमचे पैसे परत मिळण्यासाठी तुम्ही पोलिसात गुन्हा दाखल करा तेव्हा तुम्हाला न्यायालयातून पैसे मिळतील अन्यथा पैसे विसरा?
- सुरेश कुटे, अर्चना कुटे, शाहीनाथ परभणे चंदुलाल बियाणी, बबन शिंदे, एकाच माळेचे मणी?
- सुरेश कुटे अर्चना कुठे शाहीनाथ परभणी बबन शिंदे चंदुलाल बियाणी मालमत्ता विकून गोरगरिबांचे पैसे द्या?
- व्हीआयपी बंगल्यात एसी मध्ये राहणाऱ्या मल्टीस्टेट वाल्यांनी एसी गाडीत बसून फिरण्यापेक्षा गाड्या बंगले शेती विकून स्वत:ला तरी लाज वाटू द्या साहेब?
- लोकांच्या दवाखान्याला, मुलींच्या लग्नाला, मुलांच्या शिक्षणासाठी लोकांना अडचण येत आहेत अनाथ लेकरांचे सुद्धा पैसे या स मल्टीस्टेट वाल्यांना पुऱ्यांना झालेत सोशल मीडियावर व्यक्त होऊन तारीख दिली पण ती तारीख कॅलेंडरमध्ये लिहिली नव्हती का?
- जिल्हा अधिकारी व जिल्हा प्रशासनाने तात्काळ कारवाई करण्याची मागणी मागणी जनतेकडून होत आहे

बीड जिल्ह्यातील पोलीस स्टेशन मध्ये मल्टीस्टेट वाल्याच्या विरोधात गुन्हा दाखल करायला गेल्यास पहिल्यांदा मल्टीस्टेट वाल्यांना खबर कशी जाते.? की तुमची तक्रार आली आहे त्यानंतर त्या मल्टीस्टेट वाला चा माणूस येऊन तोडपाणी करून निघून जातो व ठेवीदारांना थोडसं थांबा बघू साहेब येतात देतील ते व त्या ठेविदाराचे मन परिवर्तन करून त्या ठेवीदाराला विटी भरण्याचं काम पोलीस प्रशासन व मल्टीस्टेट वाल्यांकडून होत असल्याची चर्चाही बीड जिल्ह्यामध्ये जोर धरू लागली आहे व सत्य परिस्थिती आहे की बीड शहरातील अनेक पोलीस स्टेशन आहेत त्या चार दोन पोलीस स्टेशन मधून जर मल्टीस्टेट वाल्यांच्या विरोधामध्ये जर गुन्हा दाखल करण्यासाठी एखादा फिर्यादी फिर्याद घेऊन जर मल्टीस्टेट होऊन दाखल करा म्हणून गेला तर त्या ठिकाणी मात्र त्या ठाण्यातील पोलीस कर्मचारी अधिकारी त्या बँक वाल्यांना सांगतात की अशा सी तक्रार आलेली आहे या अगोदर सुद्धा बीड शहरातील काही पोलीस स्टेशनमध्ये हा प्रकार घडलेला आहे यामुळे लोक आता पोलीस अधीक्षक कार्यालयासमोरच उपोषणाला बसण्याची दाट शक्यता आहे?

बीड /प्रतिनिधी

बीडमध्ये गेल्या अनेक दिवसा पासून हजारो कोटी रुपयांचेमल्टीस्टेटचे घोटाळे समोर आले आहे. मात्र पोलीस प्रशासन ही फक्त बघ्या भूमिका घेत असल्यामुळे ठेवीदारांनी जाब विचारायचा कोणाला पोलीस प्रशासन पोलीस ठाण्यातील अधिकारी हे ठेवीदारांना गेल्यानंतर नीट बोलत नाहीत ? असा प्रश्न उपस्थित होत असून सुरेश कुटे अर्चना कुटे कडून फक्त तारीख दिली जात आहे. यामुळे ठेवीदारांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे, लोकांच्या दवाखान्याला, मुलींच्या लग्नाला, मुलांच्या शिक्षणासाठी लोकांना अडचण निर्माण झाली आहे. मात्र कुटे तारीख देऊन मोकळे होत आहेत. पण ती तारीख येणार कधी नाही येणार कारण कॅलेंडरमध्ये ती तारीखच नाही असं फक्त असावा ठेवीदारांकडून ऐकायला मिळत आहे.

जिजाऊ मल्टीस्टेटसह आता राजस्थानी मल्टीस्टेटबरही गुन्हा दाखल झाला आहे, मग बीडमध्ये पोलीस प्रशासन ज्ञानराधाचे सुरेश कुटे आणि साईराम अर्बनचे साईनाथ परभणे यांच्यावर मेहरबान आहे का काय ? असा संतप्त प्रश्न ठेवीदारांच्या वतीने उपस्थित केला जात आहे.

अनेक लोकांचे संसार या ज्ञानराधा उद्योग समूहाचे व बँक च्या कर्मचाऱ्यांचे परिवारात उपासमारीची वेळ आलेली आहे ज्ञानराधा मल्टीस्टेट कर्मचाऱ्यांची अनेक महिन्याची पगार भेटली नाही अशी ओरड कर्मचाऱ्यांकडून ऐकायला मिळत आहे बुडाल्या जमा आहे आता आपलं काय होणार अशी चर्चा सुरेश कुठे यांच्या ज्ञानराधा कुटे उद्योग समूहात मधील गेल्या सर्व कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आलेली आहे सुरेश कुठे ज्ञानराधा सह मल्टीस्टेट कर्मचाऱ्यांचे मागणी कर्मचाऱ्यांनी होत आहे अशी मागणी होत आहे.

ज्या ठेवीदारांनी आंदोलने केली, दगडफेक केली, मोर्चे काढले, किंवा मग एखाद्या नेत्याच्या जवळचे असलेले ठेवीदारांना ठेवी परत मिळाले अशी माहिती समोर आली आहे, मात्र कुटे साहेब तुम्हाला ज्यांनी सहकार्य केलं त्यांच्याच ठेवी परत देण्यास विलंब केला जातो तुम्हाला सहकार्य करून त्यांनी चूक केली का? असा सवाल अनेक ठेवीदार मिळत आहे की यात मल्टीस्टेट वाल्यांनी स्वतःची प्रॉपर्टी विकून सुद्धा आज या लोकांचे पैसे दिले पाहिजेत अशी भावना यावेळी हे विधारांच्या तोंडा मधून ऐकायला मिळत आहे.

उद्याची २५ में ही शेवटची तारीख समजून ठेवीदार शांत आहेत, जर २५ में ला पैसे मिळाले नाही तर ठेवीदारांच्या वतीने गुन्हे दाखल करणार असल्याचा बोललं जात जाहे आज पंचवीस तारीख असताना सुद्धा या ठेवीदाऱ्यांना कोणीही पैसे दिले नाही यावेळी कुठे परभणी शिंदे सह अनेक जण फरार झाल्यात जमा आहेत यावेळी यांनी फक्त सोशल मीडिया वरती काही मोजक्या मीडिया वाल्यांना सोबत घेऊन त्यांच्या सोबत बीडच्या बाहेर जाऊन व्हिडिओ तयार करून तो व्हिडिओ जनतेपर्यंत कसा पोहोचता येईल व जनतेला कसं वेड्यात काढण्यात येईल हा प्लॅन यशस्वी करण्यात असते गुंग झाले आहेत परंतु आज सुद्धा २५ मे तारीख असताना सुद्धा कुटे, परभणी सह कुणीही पैसे द्यायला तयार नाही.

ठेवीदारांनी राजकारणी लोकांच्या नादात आपलं घर बुडवून घेऊ नयेकारण

ठेवीदारानी कोणत्याही राजकीय नेत्याच्या किंवा इतर कोणाच्या मागेपुढे न फिरता स्वतःची लढाई स्वतःच लहावी व गुन्हे दाखल करण्यासाठी सक्षम व्हावे, तरच आपल्या कटाचा पैसा परत मिळेल, काही राजकीय नेते तुमची दिशाभूल करून स्वतःची पोळी भाजून घेण्याचा काम करत आहेत, किती दिवस तारीख पे तारीख घेऊन शांत राहायचं? किती दिवस झाले आधासनावर आश्वासन मिळत आहे, काही राजकीय नेते कुटेंची पाठ राखण करत असल्याची चर्चा होत आहे, गेल्या आठ-दहा महिन्यापासून कितीतरी आंदोलने झाली मात्र एकानेही गुन्हा दाखल करण्याचा धाडस दाखक्ला नाही याचं कारण काय असू शकतं? याचा विचार ठेवीदारांनी नशीच करावा.


नाही सगळ्या ठेवीदारांना पैसे परत मिळतील थोडासा सहकार्य करा असे बोलून तारीख देतात मात्र त्या तारखेला खऱ्यावर उत्तरत नसल्यामुळे ठेवीदारांमध्ये संतप्त व्यक्त केला जात आहे. २१ मे ला ठेवीदारांचे ठेवी परत मिळणार असल्याची माहिती कुटे च्या वतीने देण्यात आली होती, परतू ज्ञानराधाच्या सर्व शाखा उघडण्यात आल्या होत्या, मात्र अचानक ज्ञानराधाचा अकाउंट होल्ड झाला, खरोखर अकाउंट होल्ड झाला की फक्त दिशाभूल करण्यासाठी हाच

खरा प्रश्न ठेवीदारांमध्ये निर्माण झाला आहे. असे कितीतरी तारीख कुटे च्या वतीने देण्यात आल्या, पुढची तारीख २५ मे दिली आहे मात्र या दिवशी पैसे मिळणार का? असा प्रश्न उपस्थित होत असून जर २५ मे ला पैसे मिळाले नाही तर नक्कीच बीड जिल्ह्यामध्ये आत्महत्याचे प्रमाण वाढेल व ठेवीदारांचा संयम सुटेल असे स्पष्ट चित्र पाहण्यास मिळत आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने तात्काळ कारवाई करावी अशी मागणी ठेवीदारांच्या वतीने केली जात आहे.ठेवीदारांना निर्माण झाला असून कुटे साहेब थोडीतरी लाज वाटू द्या राव अशी म्हणण्याची वेळ ठेवीदारावर आल्याचे चित्र पाहण्यासाठी मिळत आहे. प्रेश कुटे हे सोशल मीडिया च्या माध्यमातून येऊन कोणाचेही पैसे बुडणार.

राजस्थानी मल्टीस्टेटवर ४२० प्रमाणे गुन्हा दाखल तर कुटे, परभणेंवर पोलीस प्रशासन मेहरबान आहेका काय ? राजस्थानी मल्टीस्टेट चे अध्यक्ष चंदुलाल बियाणी यांच्यासह १७ संबालक अधिकारी, कर्मचाऱ्या विरोधात परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे,

बीड जिल्ह्यातील नेते कार्यकर्ते हे स्वत:ची पोळी भाजून घेत यावेळी ही विधारांना आपल्या नादी लावून आंदोलन मोर्चा करत आहेत आंदोलन मोर्चाची भाषा करत असताना त्यांनी आज पर्यंत काय दिवे लावले व त्यांच्या आंदोलनाने काय झाले हे कळायला तयार नाही यावेळी हेच नेते या मल्टीस्टेट वाल्यांच्या पाठीमागे भविष्यात मध्ये उभा राहतील असे गणित यावेळी निघू लागले आहे म्हणून ठेवीदारांनी बीड जिल्ह्यातील कोणत्याही नेत्याच्या कार्यकर्त्याच्या नादी लागू नये व आपला वेळ वाया घालू नये सरळ कोर्टात जाणे व पोलीस स्टेशनला जाऊन गुन्हा दाखल करणे यामध्येच ठेवीदारांचे हित आहे की पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार द्या न्यायालयातूनच तुमचे पैसे तुम्हाला मिळतील

आर्थिक गणेश शाखेचे पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे यांच्या घरामध्ये पट्ट्यावर रुपयाचा निधी सापडल्यानंतर याच बँकेसह ज्ञान राधा साई राम राजस्थानी जिजाऊ या वेगवेगळ्या मल्टीस्टेट वाल्यांकडून या अगोदर सुद्धा हरिभाऊ खाडे आणि चर्चा जोर धरू लागली असतानाच आतापर्यंत बीड जिल्ह्यातील जनतेच्या बीड पोलिस दलातील लाचखोर अधिकाऱ्यामुळेच गोरगरिबाच्या ठेवी परत मिळण्यास विलंब होत आहे काय ?



आज तेलगाव येथे कर्मवीर एडवोकेट एकनाथ आव्हाड साहेब यांना अभिवादन करताना मानवी हक्क अभियान यांचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ मिलिंद आव्हाडसोनाजी कारके .राजेश क्षीरसागर.आल्का ताकतोडे. मधुकर लोंढे अनेक पदाधिकारी उपस्थित होते



बीड बाय पासवर्ड अननस घेऊन जाणारा ट्रकचा अपघात झाला या अपघातात अपघातात ट्रकचे मोठे नुकसान व आननस रोडवर सर्वत्र पसरले बघायची गर्दी

# महावितरणची मान्सूनपुर्व कामे अंतीम टप्प्यात रखरखत्या उन्हात राबताहेत प्रकाशदूत

## देखभाल दुरूस्तीसाठी बंद करावा लागतोय वीजपुरवठा
## वीजग्राहकांनी सहकार्य करण्याचे महावितरणचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

अवकाळी पावसात झालेली पडझड व मान्सूनपुर्व देखभाल दुरूस्तीची कामे वेळेत पुर्ण करण्यासाठी महावितरणचे जीगरबाज प्रकाशदूत रखरखत्या उन्हातही अखंडीत वीजपुरवठयासाठी राबताहेत. पावसाळ्यामधे वीजग्राहकांना अखंडीत वीजपुरवठा करता यावा या दृष्टिने दरवर्षी महावितरणच्या वतीने मान्सूनपुर्व देखभाल दुरूस्तीची कामे हाती घेतली जातात. यामध्ये विद्युत यंत्रणेला अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या छाटने, रोहीत्रांची देखभाल त्याचबरोबर उपकेंद्रामधील दुरूस्ती आदी कामांचा समावेश असतो. बीड मंडळातील मान्सूनपुर्व कामांना आता वेग आला असून जवळपास ६५-७० टक्के कामे पुर्णत्वास आली आहेत. महावितरणचे कर्मचारी पुर्ण क्षमतेने देखभाल दुरूस्तीच्या कामात व्यस्त आहेत. त्यामुळे वीजग्राहकांनी वीजपुरवठा खंडीत झालेल्या काळात सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

पावसाळयामध्ये वीजपुरवठा सुरळीत रहावा यासाठी रखरखत्या उन्हातही महावितरणचे कर्मचारी सातत्याने कार्यरत आहेत. परंतु विद्युत यंत्रणांच्या देखभाल व दुरुस्तीचे कामे करण्यासाठी त्या-त्या भागातील वीजपुरवठा खंडित करावाच लागतो, सर्व भागाचा वीज पुरवठा खंडित न करता टप्प्या टप्प्याने कामे करून तेवढाच भाग खंडित करून त्या भागातील दुरुस्ती कामे केली जातात. ही कामे पावसाळ्यामध्ये ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित होऊन जास्त वेळ बंद राहू नये म्हणून वीज वाहिनीला स्पर्श करत असलेल्या झाडाच्या फांद्या छाटने, फुटलेले पीन इंसुलेटर तपासणे व बदलणे, रोहीत्रांची ऑईल पातळी तपासणी, ऑइल गळती थांबवणे, वीजवाहिनींचे खराब झालेले लाईटनिंग अरेस्टर बदली करणे, वीजहवाहिन्यांचे खराब झालेले जंपर बदली करणे, जीर्ण झालेल्या वायर बदलणे, उपकेंद्रातील सर्व यांत्रिक बाबीची व यंत्रणा यांची तपासणी करणे व त्याची दुरुस्ती करणे. तसेच प्रत्यक्ष वेळेवर आढळणाऱ्या त्रुटी दुर करणे, अशा प्रकारची अनेक कामे केली जातात. मात्र सदर कामे करीत असताना नाईलाजास्तव काही काळासाठी वीजपुरवठा खंडित करावा लागतो. त्यात अवकाळी पाऊस व वादळीवाऱ्यामुळे वीजपुरवठा खंडीत होण्याच्या प्रकार वाढत आहे. या प्रसंगालाही धीराने पुढे जात दीवसरात्र महावितरणचे अधिकारी कर्मचारी काम करत आहेत.

दुरूस्तीची कामे केल्यानंतर सुद्धा अनेक वेळा जोरदार वादळी वारा व पावसामुळे झाडे, फांद्या पडून वीज वाहिनी तुटने, वीज तारांवरील डिस्क इंसुलेटर फुटने अशा घटना घडत असतात त्यामुळे महावितरणची यंत्रणा पूर्ववत व सुरळीत करण्यासाठी कामे करावी लागतात. मात्र अगोदर प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यामुळे गतीने वीज पुरवठा सुरळीत करण्यास मदत होते. वाढत्या तापमानामूळे ग्राहकांना विजेअभावी होणाऱ्या त्रासाची महावितरणला जाणीव आहेच. मात्र देखभाल दुरुस्तीची कामे वीज यंत्रणेच्या हिताची तसेच अखंडित, सुरळीत व सुरक्षित ग्राहक सेवेसाठी असून ग्राहकांनी वीजपुरवठा बंद असलेल्या काळात थोडासा संयम राखून महावितरणला सहकार्य करावे असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.



# काँग्रेसचे सरकार सात जन्मात येणार नाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडले ठाम मत

**हरियाणा : काँग्रेसचे सरकार सात जन्मातही येणार नाही. काँग्रेसला दिलेले प्रत्येक मत वाया जाईल असे म्हणत टीकास्त्र सोडत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंडिया आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला.लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातील प्रचारासाठी हरियाणातील महेंद्रगड येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली.काँग्रेसने देशाची फाळणी केली. त्यांनी एक भारत,दोन मुस्लिम राष्ट्रे निर्माण केली आणि आता उरलेल्या भारतावरही मुस्लिमांचा पहिला हक्क आहे, असे इंडिया आघाडीतील लोक म्हणत आहेत. ते आरक्षण हिसकावण्याचा प्रयत्न करत आहेत. असे मोदी यावेळी म्हणाले.**

मोदी पुढे म्हणाले की, रॅलीतील गर्दी आणि उत्साह हे स्पष्टपणे दर्शविते की काँग्रेसची इंडिया आघाडी ही पूर्णपणे कोलमडली आहे. संपूर्ण देश एकच गोष्ट म्हणत आहे, पुन्हा एकदा मोदी सरकार. काल मी एक व्हिडीओ पाहत होतो, ज्यामध्ये लोक स्टेजवर धावत आणि चढत होते. व्हिडीओ पाहून मी विचारलं, हा गोंधळ का सुरू आहे? तर त्यांनी सांगितलं की, काँग्रेसचे लोक रॅलीत लोकांना आणण्याचे कॉन्ट्रॅक्ट देतात. प्रति व्यक्ती पैसे देतात, पण त्यांनी पैसे दिले नाहीत, म्हणून लोक धावत येऊन स्टेजवर चढले. आता अशी स्थिती असलेला पक्ष तुमचं भले कसे करू शकेल? असेही मोदी यावेळी म्हणाले.

इंडिया आघाडीवर निशाणा साधताना मोदी म्हणाले की, गाय दूध देत नाही तोवर तूप खाण्यासाठी इंडिया आघाडीतील लोकांमध्ये भांडणे सुरू झाली आहेत. पाच वर्षांत पाच पंतप्रधान होतील, असे सांगितले जात आहे. पाच वर्षात पाच पंतप्रधान, हरियाणाचे लोक



पाच हजार विनोद बनवतील. इंडिया आघाडीचे लोक अत्यंत जातीयवादी, घराणेशाहीवाले आहेत.

मला राजकारणाची समज हरियाणा आणि पंजाबमधूनही मिळाली. मी हरियाणामध्ये १९९५ मध्ये आलो. मी येथील माता-भगिनींच्या हातचे अन्न खाल्ले आहे. आता मोदींना तुमचे हे कर्ज फेडण्यासाठी खूप काम करायचे आहे. आपल्या हरियाणाला नव्या उंचीवर घेऊन जायचे आहे. यासाठीच पुन्हा एकदा मोदी सरकार गरजेचे आहे. असे पंतप्रधान मोदी यांनी यावेळी सांगितले.

# पुणे कार अपघातात प्रकरणात आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

पुणे अपघात प्रकरणातील आरोपी विशाल अग्रवालसह सहा जणांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आलीये. शिवाजी नगर न्यायालयात आज सुनावणी झाली. यावेळी सरकारी वकीलांनी ७ दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. मात्र, बचाव पक्षाच्या वकीलांनी पोलीस कोठडीची गरज नसल्याचं न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलं. सुनावणी दरम्यान सरकारी वकीलांनी विशाल अग्रवालच्या घरातील सीसीटीव्हीच्या डीव्हीआरमध्ये छेडछाड झाल्याचा आरोप केला .त्याचबरोबर ड्रायव्हर आणि विशाल अग्रवालची समोरासमोर चौकशी करण्याचीही मागणी केली. यासाठी ७ दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी सरकारी वकिलांनी केली. तर आरोपींवर लावण्यात आलेली कलमं जामिनपत्र असल्याचा युक्तिवाद आरोपींच्या वकिलांकडून करण्यात आला.

आरोपींच्या वकिलांचा युक्तीवाद

१९९ ए मोटार वाहन कायदा नुसार



अल्पवयीन आरोपींकडून गुन्हा घडला असेल तर पालकांना जबाबदार धरता येणार नाही असा युक्तीवाद आरोपींच्या वकिलांकडून करण्यात आला. गाडीच्या नोंदणीसाठी १७५८ न भरण्यासाठी ४२० कलम वाढवण्यात आलं आहे. ज्या कारणासाठी विशाल अगरवाल यांची कोठडी मागितली आहे, त्या कारण्यासाठी पोलीस कोठडीची आवश्यकता नाही.कुठल्याही प्रकरणात अटकपूर्व जामीन मिळवण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. विशाल अगरवाल त्या प्रयत्नात असताना त्याला पळून गेला म्हणणे चुकीचे आहे असंही आरोपीच्या वकिलांना कोर्टात नमुद केलं.

### आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न

पुण्यात महागड्या आणि भरधाव पोर्शे कारने दोन इंजिनिअर्सना कारखाली चिरडलं. जमावाने तिथल्या तिथेच आरोपीला चोप चोप चोपला. आरोपीला कोर्टातही हजर केलं. मात्र तो अल्पवयीन निघाला आणि आता याच आरोपीला वाचवण्यासाठी ड्रायव्हरला अडकवण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासाठी आरोपी मुलाचे वडील विशाल अग्रवालने ड्रायव्हरला ऑफर केलीय. तू कार चालवत असल्याचं पोलिसांना खोटं सांग, ड्रायव्हर गंगाधर पुजारीला मोठ्या रकमेची ऑफर, गुन्हा स्वत:च्या अंगावर घे, तुला मोठी रक्कम देतो अशी ऑफर विशल अग्रवालने ड्रायव्हरला दिली होती.

दोन्ही हॉटेल चे ऊतठ आधीच जप्त केलेले आहेत. दिलेले पैसे मुलाने कसे खर्च केले याचा तपास करण्यासाठी कोठडीची काय आवश्यकता ? मुलाच्या संबंधीच्या तपसासाठी वडिलांच्या कोठडी गरजेची नाही. हॉटेलची कागदपत्र, परवाना तपासण्यासाठी कोठडी कशाला ? मुलांनी कुठे काय केलं याचा शोध घेण्यासाठी वडील विशाल अगरवाल यांची पोलीस कोठडी आवश्यक नाही. असे मुद्दे आरोपीच्या वकिलांनी कोर्टात मांडले

ड्रायव्हरवर अग्रवालचा दबाव

विशाल अग्रवाल यानेच मुलाला गाडी चालवायला दे असं सांगितल्याचा जबाब ड्रायव्हर गंगाधर पुजारीने याआधी दिला होता. मात्र आता हाच जबाब बदलण्यासाठी ड्रायव्हरवर दबाव टाकला जातोय. त्यामुळे पुणे पोलीस आता ड्रायव्हर गंगाराम पुजारीचे कॉल रेकॉर्डही तपासणार आहेत. पुरावे नष्ट केल्याप्रकरणी विशाल अग्रवालवर कलम २०१ वाढवलं आहे.. तसंच सरकारची फसवणूक केल्याप्रकरणी ४२० चाही गुन्हा दाखल केलाय.

# रंजित घाडगे यांची तालुकाध्यक्षपदी निवड



केज / प्रतिनिधी

पुरोगामी पत्रकार संघाच्या केज तालुकाध्यक्षपदी पत्रकार रंजित घाडगे यांची निवड करण्यात आली आहे. पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी, राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अडागळे, राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्य अध्यक्ष संतोष जाधव, राज्य सचिव निलेश ठाकरे, मराठवाडा अध्यक्ष शंकरसिंह ठाकूर, उपाध्यक्ष मुबशीर खतिब यांच्या आदेशा नुसार जिल्हाध्यक्ष डी. एम. मुजमुले यांनी केज तालुकाध्यक्षपदी रंजित घाडगे यांची निवड केली. नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष पत्रकार रंजित घाडगे यांनी नियुक्तीपत्र दिले आहे. पत्रकार रंजित घाडगे यांचे पत्रकारिते सोबतच सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान आहे. पत्रकार रंजित घाडगे यांचे या निवडी बद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# सोन्याची अंगठी घेवून सोन्याचे बिस्कीट म्हणून पितळी तुकडा !

## सोन्याचे बिस्कीट देतो म्हणून पितळेचा तुकडा हवाली करून सोन्याची अंगठी काढून घेतली !

केज (बीड)

केज येथे एका अनोळखी व्यक्तीने स्वस्तात सोन्याचे बिस्कीट देतो म्हणून एका ६५ वर्षाच्या वृद्धांच्या हातातील सोन्याची अंगठी काढून घेत त्याच्या बदल्यात पितळेचा चौकोनी तुकडा देवून फसवणूक केली आहे.

या बाबतची माहिती अशी की, दि. २२ मे रोजी किसन बाजीराव मिसाळ वय (६५ वर्ष) रा. कोल्हेवाडी ता. केज हे त्यांच्या लातूर येथील मुलाला भेटून गावाकडे जाण्यासाठी आले होते. त्या वेळी दुपारी १२:०० वा. च्या दरम्यान ते केज येथील वसुंधरा बँके समोरून बस स्टँडकडे जात असताना एक अनोळखी इसमाने त्यांच्या हातातील बटवा खाली पडल्याच्या बहाण्याने लगट केली. तेवढ्यात त्या अनोळखी इसमाने त्याच्या स्वतःच्या गळ्यातील लॉकेट आणि



अंगठी काढून दुसऱ्या एका व्यक्तीला देवून त्या बदल्यात एक सोन्याच्या बिस्कीटा सारखा दिसत असलेल्या पितळ सदृश्य धातूचा चौकोनी आकाराचा लाल कागदात गुंडाळलेला तुकडा दिला. त्या अनोळखी इसमाने किसन बाजीराव मिसाळ यांनाही स्वस्तात सोने घेण्याचा आग्रह केला. त्या वेळी किसन मिसाळ हे म्हणाले की, माझ्याकडे पैसे नाहीत म्हणताच अनोळखी इसमाचे लक्ष त्यांच्या हातातील अंगठीकडे गेले त्या अनोळखी इसमाने नगदी पैशा ऐवजी अंगठीची मागणी केली. त्या नंतर किसन बाजीराव मिसाळ यांच्या कडून त्या इसमाने अंगठी घेतली आणि त्या बदल्यात सोन्याचे अंदाजे २०० ग्रॅम वजनाचे पितळ सदृश्य धातूचा पिवळ्या रंगाचा चौकोनी तुकडा एका लाल रंगाच्या कागदात गुंडाळून त्यावर पुन्हा एका लक्की ड्रॉ च्या जाहिरातीचा कागद गुंडाळून त्यांच्या हवाली केला. दरम्यान घरी गेल्या नंतर किसन बाजीराव मिसाळ यांनी पाहिले असता एवढ्या स्वस्तात २०० ग्रॅम सोने कसे असेल ? असा त्यांना संशय आला. म्हणून किसन मिसाळ यांनी दि. २३ मे रोजी केज पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांची भेट घेवून घडलेल्या प्रकारची माहिती दिली.त्या नंतर पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी या बनावट सोन्याच्या बिस्कीट प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे यांना प्राथमिक चौकशीचे आदेश दिले. त्या नुसार पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे यांनी या प्रकरणी माहिती घेत असून त्या नंतर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

# जाती-अंताच्या चळवळीला जागतिक स्तरावर नेणारे कर्मवीर - एकनाथ आवाड जिजा

२५ मे ही कर्मवीर एकनाथराव आवाड - ज्यांना प्रेमाने जिजा म्हटले जाते - ह्यांचा स्मरणदिवस. जिजांना जाऊन आज ९ वर्ष होत आहेत परंतु 'मरावे परी कीर्ती रूपी उरावे' ह्या उक्तीनुसार ते आजही आपल्याला प्रेरणा देत आपल्या सोबत आहेत. मांग जातीच्या पोतराजाच्या एका साधारण कुटुंबात जन्मलेली एक व्यक्ति हलाखीच्या परिस्थितीत शिकून, बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा अवलंब करून, जाती-अंताची व त्याद्वारे सामाजिक समतेची मशाल लाखों वंचितांच्या हातात देवून जातो हे जितके खरे आहे तितकेच कल्पना करण्यापलिकडलेही आहे!

मला माझ्या अभ्यासाच्या योगाने जिजांनी १९८९ साली स्थापन केलेल्या 'मानवी हक्क अभियान' ह्या संघटनेतील कार्यकर्ते, पदाधिकारी, शेकडो दलित आणि वंचित परिवार ज्यांच्या आयुष्याला जिजारूपी परिसाचा स्पर्श झाला त्यांचासोबत वेळ घालविण्याचा योग आला. मी माझे अनुभव कथन माझे ६ वर्षापासूनचे अमेरिकेतील वास्तव्य, माझ्या जमीन आणि जात ह्या संबंधातील पुस्तकी अभ्यास आणि मराठवाड्यातील क्षेत्र भ्रमण ह्या आधारे केले आहे.

बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या 'जातीव्यवस्थेचे निर्मूलन' (-पपळहळश्रींळेपे ष उरींश) ह्या लेखाला १५ मे रोजी ८८ वर्षे पूर्ण झाली. जिजांनी प्रत्येक श्वास ह्या लेखात लिहिलेल्या तत्त्वांना प्रत्यक्षात आणण्यासाठी मोलाने खर्ची घातला. भारतासारख्या देशात जेथे जातीव्यवस्थेची मुळं शेकडो वर्षापासून घट्ट पाय रोवून आहेत तिथे हे काम वाटतं तेव्हढं सोप्प नाही. ह्या कामाची सहसा लोकांना कल्पना देखील येऊ शकत नाही. ह्या अथक प्रयत्नात कित्येकदा जिजांवर प्राणघातक हल्ले झाले. जिजांना ही जाणीव होती की जातीअंताचा लढा हा कित्येक शतके अर्ध्यपोटी गुलामगिरी करणारा समाज हा उपाशी राहून करणं शक्य नाही. म्हणून गायरान आणि सरकारी जमीन काबीज करण्याच्या मोहीमेचे बाबासाहेब आंबेडकर आणि दादासाहेब गायकवाड यांच्यानंतर जिजांनी नेतृत्व करून तिला महत्तप्रयासाने सामाजिक पटलावर महत्त्वाचं स्थान आणलं. प्राथमिक अवलोकनावरून गायरान जमिन काबीज करण्याचा उद्देश हा केवळ त्यावर शेती करून पोटापाण्याचा प्रश्न सोडवणे इतका साधा वाटला तरी तो तेव्हढाच मर्यादित नाही. बहुल्य दलित समाज ग्रामीण भागात राहत असल्यामुळे गायरान जमीन काबीज करणे हा जाती-अंताच्या तात्त्विक लढाईचे एक महत्त्वाचे प्रात्यक्षिक आहे. हजारो वर्षापासून जाती-आधारित विभागलेल्या समाजात, दलित आणि इतर वंचित समुदायाने प्रस्थापितांच्या विरुद्ध जावून गावातील शेकडो एकर गायरान जमीन ताब्यात घेणं गरजेचं होतं. त्यासाठी लागणारी हिम्मत व आत्मविश्वास ह्या वंचित समुदायात भरवणं आणि प्रस्थापितांच्या मनात दडपण निर्माण करणं अतिशय महत्त्वाचं होतं. अर्थातच त्यासाठी लागणारी हिम्मत, हुशारी, आणि मुत्सद्दीपणा जिजांकडे पुरेपूर होता किंबहुना त्यांनी तो चळवळीत असतानाच जैविकरित्या (ीसरपळलरश्रश्रू) अंगिकारला होता. माझ्या मराठवाडा भ्रमणात मला कित्येक परिवार भेटले की ज्यांचासाठी जमीन अर्धा की पांच एकर आहे, बागायती की कोरडवाहू आहे ह्यापेक्षा स्वतःच्या जमीनीचा तुकडा असण्याचा स्वाभिमान हा बेशकिमती आहे असे वाटते!

प्रस्थापितांकडची लाचारी नाकारून मानाने जगण्याची कला जिजांनी पोटच्या पोरासारखी आम्हाला शिकवली हे जेव्हा कित्येक गावातून कानावर पडतं तेव्हा तुमच्या डोळ्यात पाणी आल्यावाचून राहत नाही. जिजांच्या भाषणाच्या आठवणी आजही लोकांच्या अंगावर शहारे आणतात. कित्येक लोकांची आयुष्य फक्त जिजांची भाषणं ऐकून बदलली आहेत हे आश्चर्यकारक वाटलं तरी नितांत खरं आहे. जिजांनी आमची मुलं शिकवून कलेक्टर व्हावीत म्हणून झोळी पसरून आमच्याकडे भीक मागितली म्हणून मी माझी मुलं शिकवली असे म्हणणारे कित्येक भेटले. लोकांनी जिजांची भाषणं ऐकून व्यसनं सोडली, बाल-विवाह थांबवले, निवडणुकी लढवल्या, स्वतःची जमीन विकत घेऊन घरं बाधली आणि स्थलांतर थांबवले, असे कित्येक अनुभव मराठवाड्यातल्या कानाकोपर्यातल्या गावची लोकं डोळ्यात पाणी आणून सांगतात तेव्हा जिजांची ही कर्तबगारी ऐकुन गुंगी येते. मग त्यांनी आपल्या घरात गौतम बुद्ध, बाबासाहेब आंबेडकर, सावित्री-जोतिबा फुले, अण्णाभाऊ साठे ह्यांचा रांगेत जिजांना बसवले ह्यात आश्चर्य ते काय?

महाराष्ट्रातील एक लाखाहुन अधिक विविध जाती-धर्माच्या कुटुंबांचे भविष्य मानवी हक्क अभियानाच्या चळवळीतून आमुलाग्र बदलले आहे. अभ्यासपूर्वक आणि जवाबदारीने मी हे मांडू इच्छितो की मानवी हक्क अभियानाची जाती-अंताद्वारे जमीन मिळवून स्वाभिमानाने जगायला शिकवणारी चळवळ ही केवळ महाराष्ट्र, भारत किंवा दक्षिण आशिया खंडातच नाही तर वैश्विक स्तरावरची महत्त्वाची चळवळ आहे. लॅटिन अमेरिकेन खंडातील ब्राजील देशातील डरपवश्रीी थींज्ञशीी चेींश-ाशपीं (चेींळाशपीं वीं ढीरलरश्रहरवीशी ठीरळी डज्ञा ढशीीर;चडढ) चळवळ ही नक्कीच मानवी हक्क अभियानाच्या तोडीची आहे



असे म्हणणे अतिशयोक्ति ठरणार नाही! अमेरिकेतील वर्णद्वेषाविरुद्ध लढलेले रोजा पार्क आणि मार्टिन ल्युथर किंग, जु.; ब्लॅक पँथर चे संस्थापक बॉबी सील आणि हुयी न्यूटन; नॅशनल असोसिएशन फॉर द अडवांसमेंट ऑफ कलर्ड पीपल (छ--उझ) चे डबलयू. बी. ई. डी बॉय, ठरगवूड मार्शल, रॉय विलकीन्स यांचा इतकेच महत्त्वाचे काम कर्मवीर एकनाथराव आवाड यांनी मानवी हक्क अभियानाच्या वतीने जातीअंतासाठी केले आहे. प्रतिकूल परिस्थितीत ह्या चळवळीसाठी झोकून दिलेले मानवी हक्क अभियानाचे असंख्य कार्यकर्ते आणि प्रसंगी आपले प्राण पणास लावून गायरान काबीज केलेले लाखों परिवार अभिनंदनास पात्र आहेत. ह्या जागतिक स्वरूपाच्या चळवळीचे नेतृत्व करणारे कर्मवीर एकनाथराव आवाड जिजा हे महाराष्ट्राचेच नाहीत तर भारताचे रत्न आहेत. असे असताना त्यांना आजपर्यंत भारत सरकारचा पद्म पुरस्कार न मिळणे ही शोकांतिकाच म्हणावी लागेल.

चळवळीत जिजांना त्यांची पत्नी श्रीमती गयाबाई आवाड जिजी यांची लाभलेली साथ ही तितकीच महत्त्वाची आहे. त्यांनी कुटुंब सांभाळतच चळवळीला हातभार लावला आणि राजकारणाच्या माध्यमातून समाजातले प्रश्न तडीस नेले. सूक्ष्म सामाजिक भान, जाणिवेतून निर्माण केलेली कर्तबगारी आणि तरीही कमालीची विनम्र असणारी मुलं सौ. शालन, डॉ. मिलिंद, आणि डॉ. सुरेखा ह्यांच्या जडण-घडणीत जिजांसोबत जिजींचाही कमालीचा वाटा आहे. जिजांपश्चात मानवी हक्क अभियानाच नेतृत्व प्रा. डॉ. मिलिंद आवाड यांचासारखा अभ्यासू, कुशल, आणि द्रष्टा व्यक्ति करत आहे हे चित्र सुखावह, ऊर्जादायी आणि आशावादी वाटणारं आहे. वेगाने बदलणाऱ्या समाजव्यवस्थेत सामाजिक चळवळींचे स्वरूप काय असेल आणि ती भूमिका अभ्यासपूर्वक कशी मांडता येईल ह्याचे वैश्विक चिंतन करण्याची क्षमता आणि ते तडीस नेण्याची कार्यनिपुणता प्रा. डॉ. मिलिंद आवाड यांच्याकडे आहे ह्याची जगभरातल्या माझ्यासारख्या कित्येक अभ्यासक आणि कार्यकर्त्यांची पूर्ण खात्री आणि विश्वास आहे.

'आमचा लढा न्यायासाठी, माणूस म्हणून जगण्यासाठी' असं ब्रीदवाक्य असणाऱ्या मानवी हक्क अभियानाची चळवळ ही जाती-अंताची असली तरी तिचा उद्देश हा असमानतेच्या वृत्तीवर घाव घालणे आहे. असमानता दाखवणाऱ्या जनसमुदायावर हल्ला करणे नाही. हा फरक समजावून घेणं हे अत्यंत महत्त्वाचे आहे - हा फरक कळला नाही तर चळवळीच्या उद्देश जातीचा अंत करण्याऐवजी जाती-अंताला विरोध करणाऱ्यांचा लक्ष्य करणे असा घेऊन चळवळ हिंसक आणि रक्त-रंजीत बनू शकते. मी अशा कित्येक संवेदनशील उच्च-जातीय लोकांना भेटलो ज्यांना जिजांच्या व्यक्तिमत्वाबद्दल आणि त्यांच्या चळवळीपददल नितांत आदर आहे किंबहुना ते त्यांचे पुरस्कर्ते आहेत! जिजा आपल्या चळवळीला सहजाचं 'दलित' हक्क अभियान हे नाव देवू शकले असते पण तसं न करता त्यांनी 'मानवी' हक्क अभियान हे शीर्षक देऊन आपली सर्वसमावेशक भूमिकाच समोर आणली आहे. जिजांच नेतृत्व हे केवळ मांग समाजापर्यंत सीमित करण किंवा त्यांना फक्त 'दलितांचा पुढारी' मानण हे सूर्याला काजवा म्हणण्यासारखं आहे. बाबासाहेब आंबेडकरांना 'दलित पुढारी' मानून त्यांच्या व्यासंगाचे रिंगण छोटे करण्याची कुचेष्टा आधीच आपल्या समाजाने केली आहे. ही त्याचीच पुनरावृत्ति म्हणायची. आपण सर्वांनीच जिजांच्या बाबतीत होणारी ही कुचेष्टा प्रयत्नपूर्वक हाणून पाडली पाहिजे व जिजांची 'मानव' असण्याची व्यापक संकल्पना पुढे नेली पाहिजे!

जिजांचं काम हे अमूल्य आहे ह्यात कोणालाही यत्किंचितही शंका नसावी. भाषण करताना 'शाहू-फुले-आंबेडकर' म्हणायची प्रथा महाराष्ट्रात आहे. ह्या तिकडीत कर्मवीर एकनाथराव आवाड यांना बसवण्याची आता वेळ आली आहे. आज जिजांच्या स्मरणदिनाच्या निमित्ताने आपण आपल्या संबोधनात 'शाहू-फुले-आंबेडकर-आवाड' बोलण्याची प्रथा जाणीवपूर्वक सुरू केली पाहिजे. असे केल्याने शाहू, फुले आणि आंबेडकर हे आपल्याला परलोकी योग्य साथीदार मिळाला असं वाटून आनंदून गेल्याशिवाय राहणार नाहीत...!

विशाल जामकर (मोबा: ७७३८१ ९५७८५) हे यूनिवर्सिटी ऑफ मिनेसोटा, अमेरिका येथे जमीन आणि जात ह्या संबंधावर पीएचडी करत आहेत. ते चार महिन्यापासून माजलगाव, बीड येथे मुक्कामाला असून आपल्या अभ्यास दौऱ्यात मराठवाड्यातील मानवी हक्क अभियानाशी संबंधित परिवार आणि कार्यकर्ते तसेच स्थानिक राजकारणी आणि अधिकारी यांच्याशी वार्तालाप करत आहेत...

## ज्येष्ठ उद्योजक मा.श्री.संजयजी जोशी यांची मातृभूमी शिक्षण संस्थेला लाख मोलाची मदत -प्रा.अण्णासाहेब राऊत

नाळवंडी । प्रतिनिधी

ज्येष्ठ उद्योजक मा.श्री.संजयजी जोशी यांचा दि.२१ मे २०२४ रोजी ६६ वा वाढदिवस साजरा झाला, त्याप्रसंगी मातृभूमी शिक्षण संस्थेचे संचालक प्रा.आण्णासाहेब राऊत यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.त्याप्रसंगी साहेबांसोबत बराच वेळ मनसोक्त गप्पा होत असताना त्यांचे योग्य मार्गदर्शन मिळाले सामाजिक कार्य करत असताना सामाजिक संस्थांना स्वतःचा अर्थार्जनाचा सक्षम पर्याय जवळ असला पाहिजे,असा सल्ला उद्योजक संजय जोशी यांनी दिला,बराच वेळ चर्चा झाल्या नंतर साहेबांनी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आपल्या मातृभूमीतील आयडियल सोशियल एज्युकेशन स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मधील विद्यार्थ्यांच्या



बद्दल चौकशी केली. संस्थेची सद्य परिस्थिती याबद्दल चर्चा केली. आपल्या संस्थेच्या माध्यमातून परिसरातील प्रतिवर्षी १२० विद्यार्थ्यांना मोफत व सवलतीचे दर्जेदार शिक्षण देण्याचा उपक्रम चालू आहे.यासाठी संस्थेला प्रतिवर्ष १२,००,०००/- लक्ष रुपये खर्च येतो. यामुळे संस्थेला मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते.या विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक सुविधांचा अभाव आहे.

संस्थेत विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना भौतिक सुविधेत येणाऱ्या अडचणी सांगितल्या,त्यानंतर त्यांना बोलता बोलता विद्यार्थ्यांना शाळेत बसण्यासाठी बैठक व्यवस्था नाही असे सांगितले, त्यानंतर त्यांनी विचारले आपल्याला कसली बैठक व्यवस्था अपेक्षित आहे... त्यावर मी त्यांना शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी ३ विद्यार्थी प्रति डेस्क याप्रमाणे १२० डेस्क आवश्यक आहेत असे सांगितले. त्यावर त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता यावर्षी विद्यार्थ्यांसाठी आवश्यक १२० डेस्क देण्याचा प्रयत्न करू असा विश्वास दिला. सुरुवातीला ३० डेस्क आपण देऊ! लवकरच उर्वरित डेस्कची ही सुविधा उपलब्ध करू असा शब्द उद्योजक संजयजी जोशी यांनी दिला.

साहेबांनी तात्काळ ३३०० प्रति डेस्क प्रमाणे ३० साठी १००,०००/- लक्ष रुपये देऊन संस्थेला गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भरीव अशी मदत केली. साहेबांच्या या मदतीने बऱ्याच सर्वसामान्य, गोरगरीब,ऊसतोड कामगार, आर्थिक दृष्ट्या मागास,विधवा अपत्य,बालकामगार, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुलं, परिसरात गरजू विद्यार्थी यांना शिक्षण देण्यासाठी अजून मोठी ऊर्जा मिळाली. साहेबांची ही लाख मोलाची मदत आम्हाला कोटी मोलाची असेल. मातृभूमीतील विद्यामंदिर आपल्यामुळे या मदतीमुळे काही प्रमाणात सुसज्ज होत आहे.या वेळी संस्थेचे संचालक प्रा.आण्णासाहेब राऊत यांनी संस्थेच्या वतीने उद्योजक मा.श्री.संजयजी शिंदे यांचे आभार व्यक्त करून त्यांचा यथोचित सत्कार केला

## महावितरण विभाग अभियंता आणि गुत्तेदार यांची बनवाबनवी



बीड (प्रतिनिधी)

जिल्ह्यातील गेवराई शहरातील ताकडगाव रोड येथे रोहित्र बसविण्यासाठी गेल्या एक महिन्यापूर्वी पोल उभे करूनही डीपी बसवली नाही. यामुळे महावितरणने नागरिकांना वेड्यात काढलं. अशा संदर्भातील वृत्त प्रकाशित होताच याची दखल महावितरणने घेतली आणि लगोलग डीपी बसवण्यात आली. परंतु त्यामध्ये विद्युत पुरवठा करुन रोहित्र कार्यान्वित अद्याप सुधा करण्यात आलेले नाहीं. डी पी ही नुसते शेतात बसविलेले बुजगावणे लवण्यासारखे लावून नुसते लोकांना वेढ्यात कडून जनतेला वेठीस धरण्याचे काम व अभियंता आणि गुत्तेदार हे जाणून बुजून लोकांला त्रास महावितरण विभागाचे अभियंता आणि गुत्तेदार हे करत आहेत. व सदरील भागातील लोकांना बनवाबनवी करत आहेत.या वर कोणाचा वचक राहल्याचे दिसत नाहीं असे स्पष्ट होत आहे.अशी चर्चा आहे.सदरील भागातल्या लोकांना कमी दाबाने विज पुरवठा होत आहे. डीपी टाकली परंतु त्यामध्ये विद्युत पुरवठा सुरू करुन सदरील भागात होत असलेली बनवाबनवी थांबून रोहित्र कार्यान्वित करावे अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाची दुरावस्था, पालखीमार्ग नव्हे मोक्ष मार्ग

पाटोदा:- पाटोदा तालुक्यातुन जाणाऱ्या पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ पालखीमार्गाची दुरावस्था झाली असुन केशव आघाव यांच्या तिरूपती कन्स्ट्रक्शन मार्फत करण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे जागोजागी खड्डे आणि भेगा पडल्या असुन दुचाकी वाहनांचे टायर भेगा मध्ये अडकुन वाहनचालकांचे नियंत्रण सुटल्याने अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे.पाटोदा ते घुमरा पारगाव दरम्यान रंदवेवस्ती याठिकाणी मोठ्या प्रमाणावर पडलेल्या भेगा मध्ये वाहनांचे चाक अडकून अपघात होत असताना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व जिल्हा प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करत आहेत. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी डॉ.गणेश ढवळे, पत्रकार हमीद खान पठाण, शेख जावेद, राहुल जाधव (राष्ट्रीय काँग्रेस तालुकाध्यक्ष), मुकुंद शिंदे शिवसेना (उबाठा) तालुकाध्यक्ष आणि विविध



### जन आंदोलनाचा इशारा :- डॉ.गणेश ढवळे

सामाजिक संघटना यांच्या निवेदन, आंदोलनानंतर थातुरमातुर डागडुजी करण्यात आली होती.परंतु पुन्हा त्याठिकाणी भेगा पडलेल्या आहेत.या रस्त्याचे भिमनगर ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक तसेच मांजरा नदीवरील पुल , पारगाव,अनपटवाडी,चुंबळी फाट,मळेकरवाडी घाट याठिकाणचे काम अर्धवट अवस्थेत असुन ठेकेदार पळुन गेला आहे. संबंधित प्रकरणात कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्यात येऊन रखडलेली कामे पूर्ण करण्यात यावीत अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी नितीन गडकरी, अरविंद काळे,प्रकल्प संचालक राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांना निवेदनाद्वारे केली असुन आचारसंहिता संपल्यानंतर सामाजिक संघटना व सर्वपक्षीय जन आंदोलनाचा इशारा दिला आहे.


पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचे काम ४-५ वर्षापासून रखडलेले असुन ३ वर्षापूर्वी पाटोदा तालुक्यातील अनपटवाडी येथील भेगा पडलेल्या निकृष्ट कामाची डॉ.गणेश ढवळे यांनी फोटो सह पोलखोल केल्यानंतर ते फोटो तत्कालीन ग्रामविकासमंत्री पंकजाताई मुंडे यांनी माजी नितीन गडकरी यांना ट्वीट केल्यानंतर याची दखल

## संत बंकटस्वामींनी गावागावात वारकरी सांप्रदाय पोहोचवला - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी)

संत बंकटस्वामींनी लहानपणापासूनच वारकरी संप्रदायाचा प्रसार आणि प्रचार केला एवढेच नव्हे तर गावागावात भजनाच्या माध्यमातून वारकरी सांप्रदाय पोहोचवण्याचे काम करून लाखो शिष्यगण शिक्षित केल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. नेकनुर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या किर्तन प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर उपस्थित होते यावेळी मठाधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे, चाकरवाडीचे मठाधिपती महादेव महाराज, ज्ञानेश्वर महाराज मंझरीकर, ह.भ.प. हरिदास जोगदंड, अभिमान महाराज ढाकणे, नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव, अमोल महाराज पवार, दिनेश महाराज काळे, पांडुरंग महाराज शिंदे, मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील, नंदकिशोर मुंदडा, श्रीमती ज्योतीताई मेटे, दिनकर कदम, अरुण डाके, सखाराम मस्के, किशोर पिंगळे, तानाजी कदम, नानासाहेब काकडे, सर्जेराव खटाणे, नवनाथ कुलकर्णी, महेंद्र फुटाणे, सचिन पाटील, अशोक शिंदे, पांडुरंग रोकडे, कल्याण शिंदे, अशोक शिंदे, मोहनराव शिंदे आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी संत बंकटस्वामींना अभिवादन करत त्यांच्या जीवनावर आधारित काही बाबी सांगितल्या संत बंकटस्वामींनी केलेल्या वारकरी सांप्रदायाच्या प्रसार आणि प्रचाराबाबत माहिती दिली. संत भगवान बाबा आणि संत वामन भाऊ हे दोन शिष्य बीड जिल्ह्यातीलच असल्यामुळे संत बंकट स्वामींचा वसा आणि वारसा त्यांनी पुढे नेला. संत बंकटस्वामींनी वारकरी सांप्रदाय



गावागावात पोहोचवण्याचे काम केले, बीड जिल्हा ही संतांची भूमी म्हणून त्यामुळेच ओळखली जाऊ लागली आहे. आज मठाधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे संस्थानच्या माध्यमातून हजारो वारकर्यांची सेवा करत असल्याचा अभिमान वाटतो असे ते म्हणाले यावेळी ह.भ.प. उल्हास महाराज सूर्यवंशी यांचे काल्याचे कीर्तन झाले.



## धारूर येथील कब्रस्तान ची जागा कागदोपत्री चुकीची माहिती नोंदवून अकृषी करून घेतली

बीड (प्रतिनिधी)

जिल्ह्याच्या धारूर तालुक्यातील कब्रस्तान ची जागा कागदोपत्री चुकीची माहिती नोंदवून अकृषी करून घेतली आहे. कब्रस्तान वाचविण्यासाठी असीम जरगर यांनी शिष्टमंडळासह जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, सर्वे नं. ६२२, ६२३ मौजे धारुर ता. धारुर जि. बीड येथील अकृषी परवानगी नं. २०१२/मशाका/जमा २ अकृषि प/सिआर/ ११ दि.०४.०६.२०१२ रोजीचा अकृषी परवाना रद्द करण्यात यावा. दिलीप हरिनाथ कोमटवार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे अकृषी परवाना मिळणे बाबत अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाच्या पुर्णपणे चौकशी कार्यवाही झाल्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी कायदेशीर अटी व नियम घालुन देवून दि.०४.०६.२०१२ रोजी अकृषी परवाना मंजुर केला आहे. परंतु सदर अकृषी परवाना मंजुर करतेवेळी संबंधीत महसुल अधिकारी यांनी सदर परवाना देणे बाबत काही अटींची पुर्तता होत नसल्याने त्या खऱ्या व कायदेशीर वस्तुस्थिती लपवल्या आहेत. कारण अकृषी परवानगी मंजुर करतेवेळी अट क्रं. ३ अशी आहे की, प्रस्तावित अकृषी जमीनी जवळ स्मशानभुमी अथवा धार्मिक स्थळ नसावेत अशी मुख्य अट आहे. सर्वे नं. ६२२ मध्ये स्मशानभुमी असताना देखील संबंधीत महसुल अधिकाऱ्यांनी व दिलीप हरिनाथ कोमटवार यांनी ही सत्यपरिस्थिती लपवुन ठेवुन भूमी अभिलेख कार्यालय यांचे मार्फत खोटे नकाशे तयार करुन ते दाखल केले व सत्य परिस्थिती लपवुन ठेवुन सर्वे नं. ६२२ मध्ये असलेली स्मशानभुमी न दाखवता अथवा स्मशानभूमी बाबत कोणतीही कागदोपत्री माहिती न देता सदर अकृषी परवाना घेतला आहे. सदर अकृषी परवाना देणेचे पुर्वी सदर मिळकती जवळ स्मशानभूमी असले बाबतचे कागदोपत्री पुरावे दिलीप कोमटवार यांनी संबंधीत महसुल अधिकारी यांचेशी आपसात संगणमत करुन, मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण घेवाण करुन स्मशानभुमी सर्वे नं. ६२२ मध्ये असताना देखील अकृषी परवाना घेतला आहे. तो परवाना रद्द करणे योग्य, न्यायाचे व जरुरीचे आहे. असे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून म्हटले

# आज शास्त्रीय संगीत सभा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील मातृस्वर संगीत विद्यालयाअंतर्गत संगीत साधना मंचाच्या माध्यमातून शास्त्रीय संगीत साधकांसाठी व रसिकांसाठी मासिक सभेचे आयोजन होणार असल्याची माहिती संयोजन समितीच्या वतीने देण्यात आली परभणी येथील प्रख्यात गायक कृष्णराज लव्हेकर यांचे गायन शनिवारी खोलेश्वर महाविद्यालयाच्या गोपीनाथ मुंडे सभागृहात सायंकाळी साडेसहा वाजता होणाऱ्या या मासिक संगीत सभेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने विश्वजीत धाट,रत्नदीप शिंगे, प्रफ्फुल्ल



दहिवाळ प्रा.डॉ.संपदा कुलकर्णी, प्रार्थना चौभारकर आदींनी केले.

# लाचखोरी अधिकाऱ्यांमुळे जिल्ह्याची बदनामी!

## बीड जिल्ह्यातील लाचखोरी थांबण्याचे नाव घेईना; आणखी एक अधिकारी जाळ्यात

तीस हजाराची लाच घेताना महामंडळाच्या कामगार अधिकाऱ्याला रंगेहाथ पकडले

गेवराई / प्रतिनिधी

गेवराई : बीड जिल्ह्याला लागलेल्या लाचखोरीच्या ग्रहणाचा भांडाफोड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकांकडून करण्यात आला. गेल्या आठवड्यात नववा अधिकारी लाचेच्या जाळ्यात अडकला आहे. एक कोटी रुपयांच्या लाच प्रकरणात अटक केलेल्या निलंबीत पोलिस निरीक्षक हरिभाऊ खाडे याला न्यायालयातून बाहेर आणताना मल्टीस्टेटमधील ठेवीदारांनी हरिभाऊ खाडे मुर्दाबाद अशा घोषणा दिल्या.

गेल्या आठवडाभरात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आठ जणांना अटक केली होती. आता शुक्रवारी धाराशिवच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा कामगार अधिकारी दिनेश राठोड यास ३० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले. महामंडळाच्या एका कर्मचाऱ्याला माजलगावला नियुक्ती देण्यात आली. मात्र, सदर कर्मचारी रुजू न झाल्याने त्याच्यावर कार्यालयीन ठपका ठेवण्यात आला. या प्रकरणात कारवाई टाळण्यासाठी परिवहन महामंडळातील कामगार अधिकारी दिनेश राठोड याने ७० हजार रुपयांची लाच मागून ६० हजार रुपयांत तडजोड केली. यातील ३० हजार रुपये घेताना तो शुक्रवारी चतुर्भुज झाला.

दरम्यान, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेटच्या प्रकरणात एका व्यवसायिकाला आरोपी करण्याची धमकी देत एक कोटी रुपयांची लाच मागून ३० लाख रुपयांत तडजोड करुन एका व्यवसायिकाच्या हाताने पाच रुपये घेतल्याप्रकरणी गुन्हा नोंद झालेला आर्थिक गुन्हा शाखेचा निलंबीत व फरार असलेला पोलिस निरीक्षक हरिभाऊ खाडे गुरुवारी स्वत:हून पोलिसांसमोर हजर झाला. त्याला शुक्रवारी न्यायालयासमोर हजर केले असता त्यास सहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. त्याच्या घरातून नगदी रक्कम, सोने, चांदी असे दोन कोटींहून अधिक रकमेचा ऐवज व मालमत्तांची कागदपत्रे आढळल्याने त्यास सात दिवसांची कोठडीची मागणी तपास अधिकारी व लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे उपाधीक्षक शंकर शिंदे यांनी न्यायालयासमोर केली.

### बीड मध्ये अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ नाथमुद्रा प्रतिष्ठान आणि नाथमुद्रा

# बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने गोरक्षनाथ जयंती निमित्त नाथदीक्षा कार्यक्रम संपन्न!

बीड (प्रतिनिधी)

अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ नाथ मुद्रा प्रतिष्ठान आणि नाथमुद्रा बचत गट यांच्या संयुक्त वैद्यमाने गोरक्षनाथ जयंती निमित्त नाथ दीक्षा कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाचे अध्यक्ष बीड जिल्हा महासंघचे अध्यक्ष भरत चव्हाण साहेब हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते माननीय श्रीमान डॉ. योगेश क्षीरसागर तसेच महासंघाचे संस्थापक अध्यक्ष माननीय जयाजी नाथ साहेब आणि व्ही.बी नाथ साहेब हे होते डॉ के बी पैठणकर नामवंत कीर्तनकार ह भ प भरत महाराज जोगी प्रा बालकनाथ यादव मु.अ.संजय सावंत सर डॉ पिराजी पाखरे व्याख्याते तसेच संजय चव्हाण डॉ गजानन चव्हाण मराठवाडा अध्यक्ष सोमनाथ धायडे कांचन धायडे कल्याण धायडे राहुल कासार धनराज जोगी गणेश धायडे सोमनाथ राजगुरे डॉ सुदाम मोगले डॉ गिरी डॉ गायकवाड राजकुमार शेळके श्री नागरगोजे बलभीम कदम राजेंद्र कदम सुनील जाधव विजयकुमार बामणे एडवोकेट राजेंद्र बन यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष जयाजी नाथ साहेब यांनी समाजाच्या विविध प्रश्नांवर आवाज



उठविण्याचे कबूल केले आणि सदैव आपल्या समाजाच्या पाठीमागे राहील हे सांगितले आणि बीड जिल्हा अध्यक्ष सदस्य व सर्व कार्यकर्ते आणि नाथ बांधव यांचे तोंड भरून कौतुक केले. तर माननीय डॉ योगेश क्षीरसागर भैया यांनी या समाजासाठी बीडमध्ये सभागृहासाठी जागा व उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले यावेळी धाराशिव लातूर जालना छत्रपती संभाजीनगर मुंबई पुणे येथून आलेल्या कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त केली भाषणापूर्वी जवळजवळ ३० ते ३५ बाल नाथ बांधवांवर नाथ दीक्षाचा कार्यक्रम संपन्न झाला गुरु नारायण कराळे पंढरीनाथ निकम यांनी नाथ बांधवांना दीक्षा दिली या कार्यक्रमात बीड जिल्ह्यातील कार्यकारणी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी खूप परिश्रम घेतले बीड जिल्हाध्यक्ष भरत चव्हाण यांनी कार्यक्रमाचे नियोजन अतिशय उत्कृष्ट केले त्यांच्या मदतीला रंगनाथ पैठणकर हरिभाऊ भराडी भैरवनाथ शिंदे दत्तात्रय शिराळकर अक्षय बामणे गणेश सावंत बीड जिल्ह्यातील तरुण कार्यकर्ते यांचाही या कार्यक्रमात मोलाचा वाटा होता सदर हाताने मदत करून सर्वजण तन-मन-धनाने कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नेमून दिलेले कामे पार पाडून अतिशय यशस्वी कार्यक्रम केला या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष यांनी केले होते तसेच सूत्रसंचालन अंजली यादव मॅडम रंजना शिराळकर मॅडम यांनी काव्यमय शैलीत भारदस्त करून कार्यक्रमाची रुची वाढविली शेवटी डवर संबळ तुंनतून श्रीमान शिंदे उत्तम पांचाळ संजय सावंत यांच्या वाद्य गजरात गुरु गोरक्षनाथांचे आरती होऊन महापंगतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यातील तरुण वृद्ध माता भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.



आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी ज्यांचा सिंहाचा वाटा होता, अन्याविरूध्द बंड पुकारून सदैव समाजसेवेसाठी तत्पर असायचे असे दलीतचळवळीचे झुंझार_नेते मानवी हक्क हक्कअभियानचे संस्थापक अध्यक्ष कालकथित_कर्मवीर_एकनाथराव आवाड साहेब यांच्या स्मृदिनानिमित्त त्यांच्या_स्मृतीस विनम्र अभिवादन.

# बुद्धांच्या विचारातच मानवी जिवनाचे कल्याण आहे - पु. भिक्खु धम्मशील थेरो

### मौजे शिवणी येथे बुध्द जयंती महोत्सव उत्साहात साजरी

बीड (प्रतिनिधी)

बुद्धांच्या विचारातच मानवी जिवनाचे कल्याण आहे. त्रिगुण पावन वैशाख पौर्णिमेला जगामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे असे प्रतिपादन पु.भिक्खु धम्मशील थेरो यांनी केले.जगाला बुद्धाच्या विचाराशिवाय तरणोपाय नाही असे त्यांनी यावेळी सांगितले. मौजे शिवणी येथे दरवर्षी प्रमाणे याहि वर्षी गुरुवार दि. २३ मे रोजी विश्ववंदनीय विश्वशांतीदुत महाकारूणीक तथागत सम्यक सम्बुद्ध यांच्या २५६८ वा जयंती महोत्सवाचे आयोजन महाविहार धम्मभूमी डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन नगर येथे पु.भिक्खु धम्मशील थेरो आणि प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था बीड यांच्या वतीने करण्यात आले होते.

गुरुवार दि. २३ मे रोजी सकाळी ८:०० वा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून धम्म मिरवणुकीस प्रारंभ झाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक येथे मिरवणुकीची सांगता झाली. यावेळी बौद्ध उपासक ,उपासिका मोठ्या संख्येने या मिरवणुकीमध्ये उपस्थित होते. मौजे शिवणी येथे सकाळी ९.०० ते १२.०० वा सांस्कृतिक भिम व बुद्ध गितांचा कार्यक्रम तसेच सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत सर्वांना भोजनदान देण्यात आले. दुपारी १.०० ते ४.०० वा यामध्ये डॉ.भदन्त इन्दवंस महाथेरो (कुशीनगर) यांची प्रमुख धम्मदेसना झाली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महावितरण विभाग बीडचे माजी अधीक्षक अभियंता रवींद्र कोलप, पिंपळनेर पो.स्टेचे



पोलीस निरिक्षक मधुसुदन घुगे, फूड अँड ड्रग्स ऑफिसर पुणे मा.वीर साहेब यांची उपस्थिती होती. यावेळी आलेल्या सर्व उपासक, उपासिका व भिक्खु संघास उपासिका दिपाताई प्रदिप रोडे यांच्याकडुन भोजनदान, खिरदान देण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आयु.दिपक भालेराव यांनी केले तर आयु.भास्कर सरपते यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी जवळपास ५० बौद्ध उपासक ,उपासिका यांनी रक्तदान केले. यावेळी दहा दिवशीय श्रामणेर शिबीराची सांगता उत्साहात झाली. बीड शहर आणि परिसरातील ७० विद्यार्थ्यांनी सदर शिबीरात सहभाग नोंदवीला होता. तरुण मुलां,मुलींच्या मनावर धम्माचे सुसंस्कार रुजावे व त्यांचे भावी जिवन सुरक्षित रहावे आणि आदर्श समाज घडावा या करीता या शिबीराचे अयोजन बुद्ध जयंतीच्या पर्वावर करण्यात आले होते.



# लवूळ ग्रामपंचायत मध्ये बोगस ठराव घेऊन उचलले बोगस बिल- विजय मोरे

### बोगस बिले पास करणाऱ्या गुत्तेदार अधिकारी कर्मचाऱ्यांची चौकशी करा.

माजलगाव (प्रतिनिधी)

विषय-, लऊळ ग्रामपंचायत ता.माजलगाव जि.बीड प्रसासकीय काळात अधिकार नसून सुधा ग्रामविकास अधिकारी यांनी बोगस ठराव तेयार करून कामे दिले आहेत व , ई- पेमेंट सिस्टम ने बोगस बिले उचले आहेत अशी माझी नम्र विनंती आहे कि लऊळ ग्रामपंचायत मध्ये प्रसासकीय काळात कोणतेही ठराव न घेता मनमानी कार भार हाकण्यात आला लऊळ ग्रामपंचायत मध्ये प्रसासकीय काळात पाणीपुरवठा ,रस्ताचे मुरूम, सिमेट रस्ताचे ,समाज मंदिर दुरूस्ती , अंगणवाडी दुरस्ती, अंगणवाडी नवीन बद्काम , जिल्हा परिषद शाळा दुरुस्तीचे, जिल्हा परिषद शाळा कलर , जिल्हा परिषद शाळा गॅस कनेक्शन ,पत्राचे गाळे बद्काम , प्रसासकीय काळात अधिकार नसून सुधा बोगस ठराव तेयार करून बोगस बिले उचलून राज्य सरकारला करोडो रुपयाच्या चुना लावण्याच काम ग्रामविकास अधिकारी व गुतेदार करत आहेत त्यामुळे लऊळ ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी व संबधित दोषींवर कारवई करून तात्काळ गुन्हे दाखल करा अशी मागणी विजय मोरे , व ग्रामस्त यांनी केली आहे लऊळ ग्रामपंचायत मध्ये प्रसासकीय काळात किती ठराव घेण्यात आहे ? ठराव रजिस्टर कोटे आहे त्यात नोदणी आहे का?

तसेच तुमी गुतेदार यांच्या सागन्या नुसार , प्रसासकीय काळात अधिकार नसून सुधा बोगस ठराव तेयार करून कामे दिले आहेत व ठराव रजिस्टर कोटे आहे त्यात नोदणी आहे का, ई- पेमेंट सिस्टम रेकॉड , पेमेंट साधर रेकॉड इतर २०१८ ते २०२३ किती कामे झाले नाहीत

माहिती अधिकार कायदा अंतर्गत माहिती मागितली होती पण चार महिने उलटून गेले पण माहिती भेटत नाही तसेच उलटसुलट उतरे देण्यात येत आहेत त्यामुळे प्रसासकीय काळात बोगस ठराव घेऊन पत्राचे गाळे बद्काम व इतर कामे नकरता गुतेदार ला , ई- पेमेंट सिस्टम ने पेमेंट केले आहेत बोगस बिले पास करून देणारा अधिकरी व संबधित गुतेदार यांची चौकशी करून तात्काळ गुन्हेदाखल करावे नसता लोकशाही मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर आदूलोन करण्यत येईल


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT